**महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांतर्गत**
**बृहन्मुंबईसाठी विशेष उप समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**आपत्ती व्यवस्थापन प्रभाग (मदत व पुनर्वसन)**
**शासन निर्णय क्र.आव्यप्र-२०१७/प्र.क्र.२२८/आव्यप्र-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- ०९ नोव्हेंबर, २०१७.

**वाचा :- १) महसूल व वन विभाग, मदत कार्य,पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाचे शासन निर्णय क्र. डिएमयु २००५/प्रक्र.७०/डीएम-१ दिनांक २४.०५.२००६**

**प्रस्तावना :-**

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास मदत करणे, निर्धारित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करणे व प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य कार्यकारी समितीला आपले कामकाज प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यकता वाटल्यास एक किंवा अधिक उपसमित्या गठीत करण्याची तरतुद संदर्भाधिन शासन निर्णयात आहे.

बृहन्मुंबईमध्ये महत्वाची शासकीय तसेच खाजगी कार्यालये आहेत. शहरात विशेषत: शहराच्या दक्षिण भागात नागरिकांची ये-जा मोठया प्रमाणात असते. एखादी आपत्ती उद्भवल्यास उदा. अतिवृष्टी झाल्यास त्याबाबत सर्व यंत्रणांमध्ये समन्वय करणे महत्वाची बाब आहे. त्यामुळे मुंबईत यापूर्वी आलेल्या आपत्ती तसेच संभाव्य आपत्ती त्यांचे परिणाम त्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना आणि भविष्यात काय कार्यवाही करावी या करीता बृहन्मुंबई महानगरासाठी अपर मुख्य सचिव ( गृह ) यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष उप सिमिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

बृहन्मुंबई महानगराची विशिष्ट भौगोलिक परिस्थिती आणि शहरात येणा-या नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीची वारंवारता विचारात घेवून आपत्ती उद्भवल्यास संभाव्य आपत्ती, त्यांचे परिणाम त्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना आणि भविष्यात काय कार्यवाही करावी याबाबत राज्य कार्यकारी समितीस सल्ला देणे व मदत करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरासाठी खालील प्रमाणे विशेष उपसमिती गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. अपर मुख्य सचिव (गृह ) | अध्यक्ष |
| २. अपर मुख्य सचिव ( मदत व पुनर्वसन ) | सदस्य |
| ३. प्रधान सचिव ( सार्वजनिक आरोग्य ) | सदस्य |
| ४. प्रधान सचिव ( नगर विकास -II) | सदस्य |

| | |
|---|---|
| ५. महानगर आयुक्त एमएमआरडीए | सदस्य |
| ६. बृहन्मुंबई महानगर पालिका आयुक्त | सदस्य |
| ७. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग | सदस्य |
| ८. पोलीस आयुक्त, मुंबई | निमंत्रित सदस्य |
| ९. जिल्हाधिकारी, मुंबई शहर | निमंत्रित सदस्य |
| १०.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | निमंत्रित सदस्य |
| ११.परिवहन आयुक्त | निमंत्रित सदस्य |
| १२.महापालिका आयुक्त, ठाणे | निमंत्रित सदस्य |
| १३.महापालिका आयुक्त, नवी मुंबई | निमंत्रित सदस्य |
| १४.महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे | निमंत्रित सदस्य |
| १५.महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे | निमंत्रित सदस्य |
| १६.अतिरिक्त महानगर पालिका आयुक्त, मुंबई | सदस्य सचिव |

वरील समितीस आवश्यकतेनुसार अन्य अधिकारी अथवा तज्ञ व्यक्तींना निमंत्रित म्हणून समितीच्या बैठकीस बोलावण्याचे अधिकार असतील.

वरील समितीने महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण , राज्य कार्यकारी समिती तसेच राज्य शासन यांना बृहन्मुंबई महानगरात झालेल्या आणि संभाव्य आपत्ती संदर्भात करावयाच्या कार्यवाहीसाठी सुचना , सल्ला तसेच मार्गदर्शन करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७११०९१२१५२१२२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षकिंत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Shrirang Shripati Gholap

Digitally signed by Shrirang Shripati Gholap
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DMU/R AND R, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e1b6e289fe7dcde27c972916398d8220a134ed8ebf6439e54d1927c5c4b28bec, cn=Shrirang Shripati Gholap
Date: 2017.11.09 12:03:09 +05'30'

**(श्रीरंग घोलप)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव/ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
२) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४) सर्व अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व मंत्रालयीन विभाग,
९) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,
१०) निवड नस्ती आव्यप्र-१